# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय

## कार्यपत्रिका क्रमांक १३

## सभावृत्तांत

दिनांक:- ८ / ४ / २०१५ वेळ. दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ८ / ४ /२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील “राजर्षी शाहु महाराज सभागृहात” आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा. थोरात वनिता एकनाथ सभापती
२. मा. पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा. भालेकर अरुणा दिलीप
४. मा. साने दत्तात्रय बाबुराव (काका)
५. मा. जाधव साधना रामदास
६. मा. पवार संगीता शाम
७. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
८. मा. बो-हाडे शुभांगी संजय
९. मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन
१०. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

याशिवाय श्री.दिलीप गावडे क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजय वाघमारे प्रशासन अधिकारी, श्री.सतिश इंगळे कार्य.अभियंता (स्था), संदेश चव्हाण कार्य. अभियंता (वि), श्री.प्रदीप पुजारी उप.अभियंता (झोनिपु/स्था), श्री.विशाल कांबळे, श्री.डी.बी.सपताळे, आबासाहेब ढवळे उप अभियंता, श्री. दाते टी.एच सहा.आरोग्य अधिकारी, श्री.पी.एम.गायकवाड उदयान अधिक्षक, श्री.गायकवाड टी.डी. हॉर्टीक्चरल सुपरवायझर, श्री.बंडवल ई.एच. हॉर्टीक्चरल सुपरवायझर श्रीम.पी.पी.गाडेकर, श्री.एन.डी.वाघ मुख्य लिपिक इ. अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सर्वांचे स्वागत करुन सभा सुरु करावी असे सांगितले. मा.प्रशासन अधिकारी यांनी दि. ११/३/२०१५ कार्यपत्रिका क्र. १२ च्या सभेचा सभावृत्तांत वाचन करुन कायम करणेत आला.

<u>**सन्मा.सदस्य/सदस्या यांनी खालील मुद्दयांवर चर्चा केली**</u>

**मा. सुलभा उबाळे**:- प्रबोधनकार ठाकरे यांचा पुतळा माझे प्रभागात स्वखर्चाने बसविणेबाबतचा ठराव प्रभाग समितीमध्ये पारित आहे. परंतु अदयापी ते प्रभागामध्येच प्रलबित आहे.

मा.क्षेत्रीय अधिकारी:- सर्व सदस्यांना नामकरणाचे ठरावांचा तपशिल दयावा.

मा.सतिश इंगळे:- याबाबत कार्यवाहीसाठी विलंब झाला आहे. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो आणि याबाबतची कार्यवाही १० दिवसापर्यंत पुर्ण करु असे सांगितले.

**मा..बो-हाडे शुभांगी**:- ड्रेनेज उघडी आहेत. औषधफवारणी बाबत विलंब होत आहे.

श्री. दाते:- स्वाईन प्ल्यूची मोहिम सुरु होती. त्याचबरोबर हायसिंथ काढणेकरीता कर्मचारी पाठविले होते. उदयापासुन धुरीकरण / औषधफवारणी होईल.

**मा.साधना जाधव**:- मोठे नाले आहेत. पाणी ओसंडून वाहते. औषध फवारणी वेळेवर होत नाही.

मा.क्षेत्रीय अधिकारी:- याकरीता आठवडयाचे वेळापत्रक केले आहे. त्याप्रमाणे काम सुरु करावे. हायसिंथचे काम बंद करुन, धुरीकरण / औषधफवारणी सुरु करा.

**मा. संगीता पवार**:- सभेमध्ये विचारलेल्या कामांबाबत आरोग्य विभागाचे अधिकारी फक्त सांगतात. प्रत्यक्षात वॉर्डात काम होतच नाही.

**मा.साधना जाधव**:- मोठे नाल्यावरचे चेंबरचे काम अपुर्ण आहे. यासाठी नागरीकांचे बोलणी खावे लागतात. काम वेळेत होत नाहीत तर टेंडर कशाला काढता.

मा. क्षेत्रीय अधिकारी:- श्री.ढवळे याबाबत जातीने लक्ष घालुन आज/उदया चेंबरचे काम पुर्ण करावे.

**मा.साधना जाधव**:- पाण्याची टाकीला चिरा पडल्यात, पाणी वाहते. संडास ब्लॉक तुंबलेत. याबाबत काहीच कार्यवाही होत नाही.

मा.क्षेत्रीय अधिकारी:- प्लॅस्टिक टाकीऐवजी सिमेंटची टाकी बांधावी. जेणेकरुन पाणी गळती होणार नाही. पाईपही लोखंडी बसवावेत.

**मा.सुलभा उबाळे**:- नामकरणाचे यापूर्वी झालेल्या परंतु प्रलंबित असलेल्या ठरावांच्या प्रती मिळाव्यात.

मा.प्रशासन अधिकारी:- “अ” प्रभागाकडे मागणी केली आहे. परंतु अदयापपर्यंत माहिती मिळाली नाही.

मा.क्षेत्रीय अधिकारी:- प्रभागाकडे ठरावाच्या प्रती मागण्यापेक्षा मागील २ वर्षाचे संबंधित ठरावांच्या प्रती वेब साईडवरुन उपलब्ध करुन घेवून, सन्मा.सदस्यांना दयाव्यात.

मा. प्रशासन अधिकारी:- ऐनवेळचा विषय, शिवसेनाप्रमुख हिंदूहदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा प्रबोधनकार ठाकरे संस्थेमार्फत स्वखर्चाने उभारण्यास

ठराव कायम होण्याची वाट न पाहता मा.महापालिका सभेकडे पाठविणेस मान्यता देणेबाबत.

मा.क्षेत्रीय अधिकारी:- मा. वनितानाई थोरात यांचे अध्यक्षतेखाली गेल्या वर्षात सर्व सभा कामकाज उत्तम पार पाडले त्यांची अखेरची सभा असलेने त्यांचे आभार व्यक्त करुन, पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यात आला.

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.</u>**

विषय क्र.१ प्रभाग क्र.११ यमुनानगर येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल येथे स्व. मिनाताई ठाकरे यांचे पुतळयाऐवजी मा.शिवसेना प्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा प्रबोधनकार ठाकरे क्रीडा विकास संस्थेच्या खर्चाने उभारणेस मान्यता मिळणेबाबत...........

मा.सुलभा उबाळे व मा.संगीता पवार यांचा प्रस्ताव

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>**

| | |
|---|---|
| **ठराव क्र. ६४** | **विषय क्र. १** |
| **दि. ८/४/२०१५** | **विभाग:- .......** |
| सुचक:-मा.सुलभा उबाळे | अनुमोदक:- मा. संगीता पवार |

संदर्भ - मा.सुलभा उबाळे व मा. संगीता पवार यांचा दि. ८/४/२०१५ चा प्रस्ताव

विषय - प्रभाग क्र.११ यमुनानगर येथील प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुल येथे स्व.मिनाताई ठाकरे यांच्या पुतळयाऐवजी मा.शिवसेना प्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा प्रबोधनकार ठाकरे क्रीडा विकास संस्थेच्या खर्चाने उभारण्यास मान्यता मिळणेबाबत...........

प्रभाग क्र.११ यमुनानगर येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल येथे स्व.मिनाताई ठाकरे यांच्या पुतळयाऐवजी मा. शिवसेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा पुतळा प्रबोधनकार ठाकरे विकास संस्थेच्या खर्चाने उभारणेस मान्यता देणेत येत आहे..

सदरचा विषय कायम होण्याची वाट न पाहता मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(वनिता एकनाथ थोरात)
सभापती
फ प्रभाग समिती

जा.क्र.फक्षेका/सभा/कावि/५६/२०१५
दिनांक:- ८/४/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय

प्रत - सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना